शुक्रवार दि.१४ जून २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २८६
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

# प्रदेशाध्यक्षपद सांभाळणं कोंबड्या पाळण्याइतके सोप्प नाही : जयंत पाटील समर्थकाचा रोहित पवारांना टोला

## शरद पवार गटातील अंतर्गत कलह चव्हाट्यावर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा वर्धापनदिन सोहळा नुकतेच अहमदनगरमध्ये पाडला. या सोहळ्यात स्टेजवरील नेत्यांनी एकमेकांना टोले लगावल्याने पक्षातील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आले आहेत. आगामी विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर हा कलह शरद पवारांची डोकेदुखी वाढवणारा ठरण्याची शक्यता देखील आहे. त्यातच आता रोहित पवार समर्थक आणि जयंत पाटील समर्थकही सोशल मीडियातून एकमेकांवर भिडल्याचे पाहायला मिळत आहेत.

जयंत पाटील यांच्याबाबत देखील रोहित पवार यांच्या अतिशय जवळच्या कार्यकर्त्याने पोस्ट करत आता त्यांना बदला अशी मागणी केली होती. निष्ठावान लढाऊ नेते शशिकांत शिंदे आणि युवा आमदार रोहित पवार यांच्यावर आता प्रदेशपक्ष संघटनेची मुख्य जबाबदारी द्यायला हवी. तसेच, सर्वांना सोबत घेऊन राष्ट्रीय पातळीवर सुद्धा पक्ष संघटना वाढवली पाहिजे, असेही लवांडे यांनी म्हटले होते.लवांडे यांच्या ट्विटनंतर जयंत पाटील यांचे निकटवर्तीय आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते ॲड. भूषण राऊत यांनी नाव न घेता थेट रोहित पवार यांच्यावर निशाणा साधला. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्षपद सांभाळणे कोंबड्या पाळण्याइतके सोप्पे नाहीये, असे ट्विट राऊत यांनी केले आहे. राऊत यांच्या ट्विटचा रोख थेट रोहित पवारांवर असल्याचे दिसून येते. कारण, बारामती ॲग्रोच्या माध्यमातून रोहित पवार यांचा पोल्ट्रीचाही मोठा उद्योग आहे. त्यामुळे, राष्ट्रवादी काँग्रेसमधील शीतयुद्ध पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहे.रोहित पवार यांनी अहमदनगरच्या वर्धापनदिन सोहळ्यात बोलताना कोणाचेही नाव न घेता थेट प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांच्यावर टीका केली. तसेच ट्विट द्वारे रोहित पवार यांनी लोकसभा निवडणुका पार पडल्यानंतर रावेरच्या जागेवरुन रोहित पवार यांनी रोहिणी खडसेंना लक्ष करत आमच्याच पक्षातील लोकांनी काम केलं नसल्याची खंत फेसबूक पोस्टच्या माध्यमातून व्यक्त केली होती. रावेर मतदारसंघात श्रीराम पाटील यांनी चांगली लढत दिली. मात्र, संघटनेकडून आवश्यक ती ताकद न मिळाल्यानं त्यांना यश आलं नाही. यासोबतच या मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांनी त्यांचं काम केलं नाही, असे रोहित पवार यांनी म्हटलं होतं.रोहित पवार आणि रोहित पाटील यांना पक्ष संघटनेत जबाबदारी दिली जावी, अशी मागणी सातत्यानं कार्यकर्त्यांच्या वतीने केली जात होती. याबाबत स्वतः शरद पवार यांनी देखील जयंत पाटील यांना रोहित पवार आणि रोहित पाटील यांना जबाबदारी देण्याबाबत सांगितलं होतं. परंतु, याबाबत जयंत पाटील यांनी टाळाटाळ केल्यामुळेच रोहित पवार नाराज असल्याचे बोलले जात आहे. मागील अनेक दिवसांपासून मनात असणारी खदखद रोहित पवार यांनी थेट जाहीर सभेत व्यक्त केल्यानं पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना देखील ही बाब आवडली नसल्याची माहिती सुत्रांकडून मिळत आहे.



### पंकजाताई मुंडे आणि गोपीनाथ मुंडे साहेबांवर प्रचंड प्रेम करणारा

# निस्वार्थी कार्यकर्ता पोपट वायभासे याने आत्महत्या करून आपले जीवन संपवले


## चिंचेवाडी येथील मुंडे समर्थक युवकाने फेसबुक वर अलविदा लिहीत संपवली जिवन यात्रा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा झालेला निसटता पराभव जिव्हारी लागल्याने चिंचेवाडी येथील मुंडे समर्थक असलेल्या एका तरूणाने गळफास घेऊन जिवन संपवल्याची घटना मंगळवारी दि . ११ जुन च्या रात्री बारा वाजेच्या दरम्यान घडली.पोपट वायभासे असे मृत तरूणाचे नाव आहे. बीड जिल्ह्यातील अशी ही दुसरी घटना असून यापूर्वी ९ जून रोजी अंबाजोगाई येथील युवकानेही मुंडे यांचा पराभव जिव्हारी लागल्याने जीवन संपवले होते.

आष्टी तालुक्यातील चिंचेवाडी येथील पोपट मधुकर वायभासे ( वय ३७) हा तरूण मुंडे समर्थक होता.नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत पंकजाताई मुंडे यांचा पराभव झाल्याने तो नाराज झाला.पराभव झाल्यापासून तो सारखा विचारात होता.मंगळवारी रात्री त्याने कोणाला काही एक न बोलता चिंचेवाडी शिवारात जाऊन एका झाडाला गळफास घेऊन जिवन यात्रा संपवल्याची घटना घडली. या प्रकरणी अंभोरा पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.शोकाकुल वातावरणात बुधवारी दुपारी त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.मृताच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,एक मुलगी असा परिवार आहे.पंकजाताई मुंडे आणि गोपीनाथ मुंडे साहेबांवर प्रचंड प्रेम करणारा,निस्वार्थी कार्यकर्ता पोपट वायभासे याने आत्महत्या करून आपले जीवन संपवले.मित्रा,कारण काहीही असेल पण आत्महत्या हे त्यावरचे उत्तर कधीही नाही.पोपट तू चुकलासच.आयुष्यभर कायम स्मरणात राहशील...या प्रकाराने चिंचेवाडी गावांसह बीड जिल्हातील लोक, अपेष्ट नातेवाईक,व मित्र परिवार हळ हळ,तळ तळ करीत आहेत.



# जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी उमरखेड तालुक्यातील कर्मचाऱ्यांचा घेतला आढावा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरखेड । सय्यद रहीम रजा

दि१२ आज दिनांक १२ जून २०२४ रोजी उपविभागीय कार्यालय येथे जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी आढावा बैठक घेण्यात आली या आढावा बैठकीला उपस्थित उपविभागीय अधिकारी सकाराम मुळे , उमरखेड तहसिलदार आर यु सुरडकर उपस्थित होते. उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंतराव गायकवाड, उमरखेड पंचायत समिती गटविकास अधिकारी प्रवीण कुमार वानखडे, नगरपरिषद उमरखेड चे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश जामनोर, पुरवठा निरीक्षक श्री गुट्टे, सा बा विभाग श्री खसावत व कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.जलयुक्त शिवार, आयुष्यमान भारत , पांधण रस्ता, भूमी अभिलेख,पि एम आवास योजना, रमाई आवास योजना , शेतकऱ्याला पुरतील एवढे बी बियाणे व खते यांचा पुरवठा व्यवस्थित आहे. किंवा नाही त्याकडे विशेष लक्ष देण्यात आले. शेतकऱ्यांची पेरणीच्या वेळी तारांबळ होऊ नये म्हणून त्यांना योग्य वेळी खते बी बियाणे मिळणे अनिवार्य आहे. पी एम किसान योजनांचा फायदा शेतकऱ्यांना झाला पाहिजे. सोयाबीन व



कापूस उत्पादकता वाढावी. शेतकऱ्याचे शेततळे किती झाले आहेत व शेतकऱ्याचे शेत तळे किती होणे बाकी आहे. या सर्व चालू कामाचा आढावा घेण्यात आला. उमरखेड डॉक्टर डी एच ओ, पी एस सी, येथील मॅट्रिम मशीन चालू आहे किंवा नाही, मेडिकल औषध उपचार व्यवस्थित होत आहे किंवा नाही याविषयी विचारणा करण्यात आली. सर्व नायब तहसिलदार व मंडल अधिकारी यांना ,चातारी दराटी ,ढाणकी, निगनुर, सोयीट उमरखेड या सर्व येथील कामाविषयी विचारणा करण्यात आली. त्यांच्या कामाचा तेथील आढावा घेण्यात आला. ई चावडी प्रकरणे पाहण्यात आले.

# खासदार बजरंग सोनवणे यांनी घेतली मराठा आंदोलन कर्ते मनोज जरांगें पाटलांची सराटी अंतरवलीत भेट

### उपोषणाची दखल घेण्याची सरकारला सूचना करा'; बजरंग सोनवणेंची राज्यपालांकडे मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी उपोषण करणाऱ्या मनोज जरांगे यांच्या उपोषणाची सरकारला दखल घेण्याची सूचना करावी, अशी मागणी खासदार बजरंग सोनवणे यांनी राज्यपालांकडे केली आहे. याबाबत त्यांनी बुधवारी राज्यपालांना निवेदन पाठविले आहे. मनोज जरांगे पाटील यांनी शनिवार पासून अंतरवाली सराटी येथे उपोषण सुरु केले आहे. पाच दिवसांपासून मनोज जरांगे यांनी अन्न,पाणी सोडल्यामुळे त्यांची प्रकृती खालावत चालली आहे. मनोज जरांगे यांच्या मागण्यांविषयी महाराष्ट्र सरकारची उदासिन भूमिका दिसत असल्याचे या निवेदनात म्हटले आहे.



सध्या त्यांची तब्येत बिघडली आहे. त्यामुळे त्यांना सलाईन लावण्यात आली आहे.महायुती आणि महाविकास आघाडीतील अनेक नेत्यांनी जरांगे यांची उपोषणस्थळी जाऊन भेट घेतली आहे. महाविकास आघाडीचे अनेक नवनिर्वाचित खासदार संजय जाधव, खासदार ओमराजे निंबाळकर यांनीही जरांगे पाटील यांच्या उपोषणाला जाहीर पाठिंबा दिला आहे. मनोज जरांगे पाटील यांची तब्येत खालावण्या आधी ताबडतोब सर्व मागण्या पूर्ण करण्याची मागणी राज्यपालांकडे केल्याचं सांगितलं. या आंदोलनाची शासनाने वेळीच दखल घेतली नाही तर राज्यात गंभीर परिस्थिती निर्माण होण्याचा धोका असल्याचेही पत्रात म्हटले आहे.या विषयात राज्यपालांनी स्वत: जातीने लक्ष घालावे व राज्य सरकारला उपोषणाची दखल घेण्याची सूचना करावी,अशी मागणी खासदार बजरंग सोनवणे यांनी केली. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील हे लोकसभा निवडणुकी नंतर पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत.ते पुन्हा पाच दिवसापासून आमरण उपोषणाला अंतरवाली सराटी येथे बसले आहेत. सध्या त्यांची तब्येत बिघडली आहे. त्यामुळे त्यांना सलाईन लावण्यात आली आहे.महायुती आणि महाविकास आघाडीतील अनेक नेत्यांनी जरांगे यांची उपोषणस्थळी जाऊन भेट घेतली आहे.




## चारोळी

निळ्या आभाळी
काळे मेघ दाटूनी आले
गुज प्रीतचे बोलुनी कानी
अंगणात मस्त नाचूनी गेले.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# विदर्भ,मराठवाडा,मध्य महाराष्ट्रात वादळी पावसाचा यलो अलर्ट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात सध्या मान्सूनची जोरदार बॅटिंग सुरू आहे. खान्देश, पूर्व विदर्भाचा काही भाग सोडून राज्याच्या बहुतांश भागात मोसमी वारे पोहोचले आहेत. अनेक ठिकाणी मुसळधार पावसाच्या सरी कोसळत आहेत. त्यातच आजही विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्रामध्ये काही ठिकाणी विजांसह वादळी पावसाचा येलो अलर्ट हवामान विभागाने दिला आहे. तर हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी दिलेल्या माहितीनुसार १४ जून पर्यंत राज्यात दररोज भाग बदलत पाऊस पडणार आहे.हवामान खात्याकडून, मुंबई, रायगड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये आज मध्यम पावसाची शक्यता आहे.

संपादकीय

# नायक ते नकोसे!

'रोहित शर्मा आणि विराट कोहली या भारताच्या ख्यातनाम क्रिकेटपटूंसाठी उद्यापासून सुरू होत असलेली टी-२० विश्वकरंडक स्पर्धा ही भारताला जागतिक पातळीवरील जेतेपद मिळवून देण्याची अखेरची संधी आहे.' गेल्या दोन दिवसांपासून क्रिकेट वर्तुळातील सगळी चर्चा याच बातमीभोवती फिरते आहे. आता खरे तर भारतीय संघात हे दोघे सोडून इतरही खेळाडू आहेतच की. आणि, क्रिकेट हा सांघिक खेळ असल्याने केवळ हे दोघेच संघाला जिंकून देऊ शकतील, असे म्हणण्यात काय अर्थ? पण भारतीयांना कोणत्याही क्षेत्रात नायक लागतात. त्या नायकावर आपण कळत-नकळत आपल्या आकांक्षा पूर्ण करण्याचे ओझे टाकतो. उदाहरणार्थ, क्रिकेटमध्ये सचिन तेंडुलकर खेळला तरच भारत जिंकेल, असे काही दशकांपूर्वी आपण ठरवूनच टाकले होते. तेंडुलकर बाद झाला की टीव्ही बंद वगैरे. आता तेंडुलकर खेळाडू म्हणून महानच होता, पण म्हणून सगळ्या मैदानभर तोच पळून धावा अडवील, तोच सगळ्या खेळाडूंना बाद करील आणि सगळ्या धावाही तोच काढील, असे कसे होणार? तरीही त्याला डोक्यावर बसवले गेले. त्याच्याकडून दर वेळी काही तरी चमकदार होण्याची अपेक्षा धरली गेली. त्याआधी सुनील गावस्कर यांच्याबाबत असेच व्हायचे. गावस्कर, कपिलदेव, तेंडुलकरसारख्या खेळाडूंना साथ देणारे आणि पर्यायाने संघाला जिंकून देणारे उपयुक्त खेळाडू संघात असतील, तरच आपण जिंकू शकू, हे मान्य करायला आपण फार वेळ घेतला. त्याचे परिणाम भारतीय क्रिकेट अजून भोगते आहे. त्यामुळेच मग क्रिकेटची शैली बदलली, छोट्या छोट्या उपयुक्त खेळ्या खेळणाऱ्या खेळाडूंचे महत्त्व अधोरेखित झाले, तरीही आपण अजून नायकच शोधतो आहोत आणि टी-२० विश्वकरंडक स्पर्धा सुरू होतानाही संपूर्ण भारतीय संघाची चर्चा न करता केवळ रोहित शर्मा आणि विराट कोहलीभोवती घुटमळतो आहोत.एखादा खेळाडू असतो अधिक गुणवान आणि त्याची कामगिरी असते खरेच महान, पण खेळ सांघिक असेल आणि त्याची वैयक्तिक कामगिरी कितीही उत्तम होऊनही ती संघाला जिंकवत नसेल, तर त्याचा काय उपयोग? आता हे म्हणताना कोणत्याही उत्कृष्ट खेळाडूचे कौशल्य नाकारण्याचा मुद्दाच नाही. मुद्दा आहे, तो संघ जिंकण्याचा. त्यामुळे त्या महान खेळाडूची संघातील भूमिका काय आणि कुठपर्यंत असेल, याचीच अधिक चर्चा व्हायला हवी. सध्याच्या टी-२० च्या जमान्यात साडेतीन तासांत ४० षटकांत एका संघातील ११ जणांना आपापली भूमिका चोख पार पाडायची असते. अशा वेळी आधीची 'उज्ज्वल कारकीर्द' वगैरेवर विसंबून चालत नाही. उपलब्ध साडेतीन तासांत आपल्याला संघासाठी नेमके काय करायचे आहे, हे जो शिकला, तो टिकला एवढे साधे हे समीकरण आहे. महेंद्रसिंह धोनीला याचे भान फार लवकर म्हणजे २००७ मध्येच आले. त्यामुळेच त्या वर्षीच्या पहिल्या टी-२० विश्वकरंडक स्पर्धेतील अंतिम सामन्यातील महत्त्वाचे अंतिम षटक त्याने अशा जोगिंदर शर्माला दिले, जो सध्या क्रिकेट खेळतो तरी का, हेही शोधावे लागेल. जोगिंदर शर्माकडून जे आणि जेवढे हवे होते, ते धोनीने काढून दिले आणि जेतेपद मिळवले. त्याची ही खेळी त्या वेळी फसलीही असतीच, पण त्याने 'उज्ज्वल कारकीर्द' वगैरे असलेल्या उत्तम गोलंदाजाला षटक देण्याची 'परंपरा' मोडून त्या वेळी उपयुक्त कोण ठरेल, याचा विचार केला आणि आपला डाव खेळला, हे त्याचे बदललेला खेळ जोखण्याचे चाणाक्षपण उरतेच. वीरेंद्र सेहवाग आणि व्हीव्हीएस लक्ष्मण या 'उज्ज्वल कारकीर्द' असलेल्या फलंदाजांबाबतही धोनीचा हा चाणाक्ष उपयुक्ततावादी दृष्टिकोन वाखाणण्यासारखा होता, जरी त्या वेळी त्याच्यावर टीका झाली होती. हे दोघे क्षेत्ररक्षणात चपळ राहिले नसल्याने त्यांना संघात स्थान देणे उचित नाही, असे त्याचे म्हणणे होते. क्रिकेटच्या बदललेल्या स्वरूपात संघ जिंकवायचा असेल, तर खेळाडूला फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण अशा सर्वच बाबींत नेमून दिलेली उपयुक्त कामगिरी करावीच लागेल, हेच तो मांडू पाहत होता.मुद्दा असा आहे, की जग बदलले, तसे क्रिकेटही बदलणारच. क्रिकेटही कसोटीकडून 'वन-डे'मार्गे 'टी-२०'कडे आले आहे. 'टी-२०' हा उण्यापुऱ्या साडेतीन तासांचा खेळ. इतकेच कशाला, क्रिकेटची जन्मभूमी समजल्या जाणाऱ्या आणि अभिजाततेचा कमाल आग्रह वगैरे धरणाऱ्या इंग्लंडच्याच संघाने कसोटीत 'बॅझबॉल' हा प्रकार आणला आहे. नजाकतीपेक्षा ताकद आणि वर्चस्व महत्त्वाचे, असे मानणारी ही पद्धत कसोटीचेही स्वरूप बदलू पाहत आहे. त्यामुळे आता कसोटीतही 'टी-२०'मधला उपयुक्ततावाद उंबरठ्यावर आहेच. तरीही, कसोटी सामन्यांनी क्रिकेटमधील अभिजातता टिकवावी, असा आग्रह स्मरणरंजनात रमलेल्यांकडून होताना दिसतो. पण अभिजाततेचा आग्रह धरणे म्हणजे जुन्याला कुरवाळून नव्या शक्यतांकडे दुर्लक्ष करणे नाही. वर्तमानाच्या मानगुटीवर भूतकाळ बसला तर भविष्याची १०० शकले व्हायला वेळ लागत नाही.म्हणूनच मग विराट कोहली आणि रोहित शर्मा आताच्या टी-२० विश्वकरंडक स्पर्धेत हवेत की नाहीत, याची चर्चा त्यांच्या नायकत्वाला साजेसा निरोप वगैरेवर न घुटमळता आत्ता त्यांची प्रत्येक सामन्यात किती उपयुक्तता आहे, यावरच व्हायला हवी. नुकत्याच संपलेल्या 'आयपीएल'मध्ये विराटने खोऱ्याने धावा काढल्याचे कौतुक झाले खरे, पण या स्पर्धेच्या सुरुवातीला त्याचा 'स्ट्राइक रेट', म्हणजे किती चेंडूंत किती धावा काढल्या, याचे समीकरण टी-२० खेळाला फारसे साजेसे नव्हतेच. त्यावर टीका झाल्यावर विराटच्या चाहत्यांनी टीकाकारांना 'ट्रोल' केले. पण सुनील गावस्कर यांनीच त्यावर उत्तर दिल्याप्रमाणे, भाष्यकार म्हणून समोर दिसणाऱ्या वास्तवावर बोलायचे नाही, असे करून कसे चालेल? रोहितचाही खेळ 'आयपीएल'मध्ये फार बहरलेला नाही आणि काही सामन्यांत तर तो 'प्रभावी खेळाडू' नियमामुळे केवळ फलंदाजीसाठी आला आहे, त्याने क्षेत्ररक्षण केलेलेच नाही. या सगळ्याचा अर्थ असा, की ३५ वर्षांच्या विराटला किंवा ३७ वर्षांच्या रोहितला संघात खेळवताना त्यांच्या 'उज्ज्वल कारकीर्दी'पेक्षा त्यांच्या आत्ताच्या उपयुक्ततेवरच चर्चा व्हायला हवी. ऑस्ट्रेलियाचा क्रिकेट संघ याबाबत पुरता व्यावसायिक. ऑस्ट्रेलियाला २०१५ चा विश्वकरंडक जिंकून देणाऱ्या संघाचा कर्णधार मायकेल क्लार्कने या स्पर्धेच्या अंतिम सामन्यापूर्वीच निवृत्ती जाहीर करून टाकल्याचे अनेकांना स्मरत असेल. त्या वेळी तो ३३ वर्षांचा होता, बहरात होता, लोकप्रिय होता. पण त्याच्या उपयुक्ततेची मर्यादा संपल्याची त्याला जाणीव झाल्यावर त्यानेच आपण होऊन निवृत्ती घेतली. याचा अर्थ इतकाच, की जेत्याला साजेशी कामगिरी हवी असेल, तर संघाला नायकांची फौज नाही, तर उपयुक्त कामगिरी करणाऱ्यांची कुमक हवी असते.क्षेत्र कोणतेही असो. अशा उपयुक्त खेळाडूंची कुमक तयार करण्यावर खरा भर हवा. ते राहिले बाजूला. आपला सगळा भर एखादा कोणी नायक शोधायचा आणि तो आता आपले कसे भले करून देईल याची वाट पाहात हातावर हात ठेवून बघत बसायचे. मुद्दा भ्रष्टाचारमुक्तीचा असो किंवा राजकारणाचा. जे काही करायचे ते 'त्यांनी'. म्हणजे नायकांनी. एकदा का एखादा नायक सापडला की आपण त्याला देव्हाऱ्यात डांबण्यासाठी अधीर होणार आणि पुन्हा आपली निष्क्रियता आहेच येरे माझ्या मागल्या म्हणत. नायकांनाही हे आवडू लागते मग. तेही स्वत:ला तारणहार वगैरे मानतात. मग एक वेळ येते अशी की हे नायकही नकोसे वाटू लागतात. नायकत्व संपते कधी आणि नकोसे होणे सुरू होते कधी हे लक्षात घेणे महत्त्वाचे. नाही तर आहेच रवानगी मार्गदर्शक मंडळात!

# खासदारकी पदापेक्षा आंबेडकरांचा नातू पद मोठे

बहुजन समाजाचे श्रद्धेय बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकरांना लोकसभा २०२४ च्या निवडणुकीतील पराभवामुळे आत्मपरिक्षण करणे गरजेचे आहे.विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महार समाजाला बौद्ध धम्म दिला. तो माणसाला धम्म सांगतो लाचार होऊन जगू नका.आणि अहंकाराने गर्वा वागून समजापासून वेगळे राहू नका.तर मध्यम मार्ग स्वीकारून माणसाशी माणसासारखे वागा.पण काही लोक राजकारण, समाजकारण आणि धर्मकारण सर्व ठिकाणी मी बरोबर बाकी सर्वच चुकीचे असे वागतात. त्यात प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर बसतात असे आता ग्रामीण भागातील बहुजन समाजाचे शेतकरी शेतमजूर बोलायला लागले.

प्रकाश आंबेडकरांचे गणीत विधानसभा लोकसभा निवडणुकीत चुकते की,ते इतरांचा पराभव करण्यासाठी स्वत:हुन पराभव पत्करतात हेच समजत नाही.त्यांना इतर पक्षाचे उमेदवार पाडण्यातच आनंद मिळवायचा असतो का?.त्यासाठी ८५ टक्के बहुजन समाजातील तीस पस्तीस टक्के बहुजन समाज जागरूक होऊन त्यांच्या मागे उभा राहील पाहिजे असतो. तो पण नसतांना हा अहंकार गर्व समाजाचे प्रचंड नुकसान करणारा ठरत आहे.प्रकाश आंबेडकर यांच्याकडे खासदारकी पदापेक्षा आंबेडकरांचा नातू हे पद मोठे आहे.समाजात कुठे ही गेला तर या नातू पदाला योग्य मान सन्मान मिळणार आहेच.पण समाजाकडे असे काही नाही. की निवडणुकीत मतदान केल्याने किंवा न केल्याने त्यांना भेटणार नाही. त्याला गावात शेतमजूर म्हणून आणि शहरातील झोपडपट्टीत बांधकाम मजूर,घरकाम मजूर असंघटित मजूर कष्टकरून जगावे लागणार आहे. त्याशिवाय त्याला पर्याय नाही.म्हणूनच त्याला निवडणुकीत कोण जिंकला आणि कोण पराभूत झाला यामुळे काहीच फरक पडणार नसतो.मागीतल्याने मिळत नाही आणि संघर्षा शिवाय पर्याय नाही. संघर्ष करतांना ही तडजोड करणे आवश्यक असते. तुटे पर्यन्त ताणले तर तुटल्या शिवाय राहत नाही. आणि तुटलेले नंतर जुळत नाही.विविध विचारांच्या राजकीय पक्षांच्या युती आघाडीच्या वातावरणात परिस्थिती नुसार निर्णय घेणाऱ्या पक्ष नेतृत्वाच्या तुलनेत प्रकाश आंबेडकर यांनी २०१४ पासूनच्या विधानसभा,लोकसभा निवडणुकीत अशीच भूमिका घेतली की त्यामुळे युती ही नाही आणि आघाडी ही नाही. त्याचा परिणाम समाजापासून पक्षापासून तुटलेल्या अवस्थेतील समाज व त्यांचे कार्यकर्ते असा झाला. पण प्रकाश आंबेडकर यांच्याकडे खासदारकी पदापेक्षा आंबेडकरांचा नातू हे पद मोठे आहे.समाजात कुठे ही गेला तर या नातू पदाला योग्य मान सन्मान मिळणार आहेच.पण समाजाकडे कार्यकर्त्याकडे असे काही नाही.त्यामुळे त्याला जागो जागी त्याची शिक्षा अपमान सहन करून भोगावी लागते.काहीना रोजगार मिळत नाही.नंतर अनेक समस्याना तोंड द्यावे लागते.म्हणूनच मी ९३ टक्के असंघटित कष्टकरी मजुरांना आवाहन करणारे निवडणुकीच्या काळात लिहले होते.प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन



आघडीचा उमेदवार निवडून येणार नसेल तरी स्वाभिमानाने जगण्यासाठी वंचितलाच मतदान करा.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत अकोला व सोलपुर मतदारसंघात स्वता उभे राहून एकाही ठिकाणी ते निवडुन आले नाही.महा विकास आघाडीचे अनेक उमेदवार पाडले.यांची इतिहासात नोंद झाली.इतिहास वाचला की इतिहास घडविता येतो असे सांगतात. पण आपण इतिहसातून कोणताही धडा घेतला नाही.कारण प्रकाश आंबेडकर यांच्याकडे खासदारकी पदापेक्षा आंबेडकरांचा नातू हे पद मोठे आहे. समाजात कुठे ही गेला तर या नातू पदाला योग्य मान सन्मान मिळणार आहेच.पण समाजाकडे असे काही नाही.ग्रामीण भागातील असंघटित शेतमजुरांना आणि शहरतील सुरक्षित ठिकाणी राहून सुरक्षित नोकरी करणाऱ्यांना व इतर सर्वसामान्य जनतेला हेच वाटत होते की,प्रकाश आंबेडकरांनी महाविकास आघाडीत सामिल व्हायला हवे होते.परंतु प्रकाश आंबेडकरांच्या वेगळे लढण्याच्या भुमिकेने वारंवार हे चित्र पहायला मिळते आहे. मोठ्या मोठ्या पक्षालाही आघाडी युती करण्याची गरज वाटते,मग प्रकाश आंबेडकरांना अशी आघाडी का नको असते.आज प्रकाश आंबेडकरांची वंचित मविआचे सोबत असती तर वंचितचे किमान २ तरी उमेदवार निवडुन आले असते.महाविकास आघाडीची संख्या वाढली असती. प्रकाश आंबेडकरांच्या वंचितने कोणाशीही आघाडी न केल्यामुळे त्यांचा दारुण पराभवा झाल्याची नोंद इतिहासात झाली.जागरूक समाजाने ही प्रकाश आंबेडकर यांच्या भूमिकेला पाठिंबा दिला नाही.हे सत्य चित्र समोर आले आहे. येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत कोणीच उमेदवार वंचित बहुजन आघाडीची उमेदवारी घेणार नाही. परंतु भाजपा कॉंग्रेस राष्ट्रवादी शिवसेना पैसे देऊन डमी उमेदवार पुरविण्याचे काम शंभर टक्के करेल.आणि बहुजन समाजात भ्रम निर्माण करण्याचे यशस्वी प्रयत्न करेल. कारण प्रकाश आंबेडकर यांच्याकडे खासदारकी पदापेक्षा आंबेडकरांचा नातू हे पद मोठे आहे.समाजात कुठे ही गेला तर या नातू पदाला योग्य मान सन्मान मिळणार आहेच.पण समाजाकडे असे काही नाही.इंडिया आघाडी सोबत प्रकाश आंबेडकर यांनी युती करायला पाहिजे होती युतीत राहिले असते तर निवडून आले असते.असे लोक आता उघड बोलायला लागले.

बुद्ध,शिवाजी,फुले,शाहू,आंबेडकर विचारावर श्रद्धा ठेऊन संघर्ष करणारे राजकारण एक मिशन म्हणून काम करणारे कार्यकर्ते आणि समाज कायम श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांच्या सोबत राहील. काही लोक म्हणतात बाळासाहेब हरले पण खऱ्या अर्थाने बाळासाहेब हारले नाहीत. समाज हारला. ते आंबेडकरांचे नातू आहेत,ते रक्ताचे वारसदार,विचारांचे वारसदार आणि समाजाचे शक्तीदाते,मार्गदाते आहेत.जर कोणी हरलं असेल तर तो इथला बहुसंख्य बहुजन ओबीसी,एस सी,एस टी,आदिवाशी,अल्पसंख्यक मुस्लिम हारलाय.या समाजावर अन्याय अत्याचार झाला तर प्रथम आंबेडकर व आंबेडकर विचार मानणारा कार्यकर्ताच पुढे येतो आणि येणार.

प्रकाश आंबेडकर काल ही नातू होते आणि आजही नातू असणार आहेत. त्यांनी समाजकारण राजकारण सोडून दिले तर काय होईल?. अन्याय अत्याचार ग्रस्त वंचित वर्गाला सत्तेत बसवण्यासाठी जी त्यांची तन मन धनाने धडपड होती व आहे ते सर्व घटक स्वतः हरले आहेत. त्यांना गावात प्रस्थापितांची गुलामी करण्यात जी धन्यता वाटत आहे.त्याला बाळसाहेबांचा नाईलाज आहे. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले,राजर्षी शाहू महाराज,अण्णाभाऊ साठे,मान्यवर कांशीराम यांनी ही समाजासाठी कष्ट त्याग केला जिद्दीने प्रबोधन करून परिवर्तन करण्याचा जिवापार प्रयत्न आणि संघर्ष केला.आमदार खासदार मंत्री बनणे हा त्यांचा कधीच उद्देश नव्हता. तरी त्यांचे नांव व कार्य आज ही सर्व देशवाशीयांना लक्षवेधी व प्रेरणादायी आहेत.१९५२ पासून किती आमदार खासदार मंत्री झाले ते समाजाला कुठे आठवतात आणि प्रेरणा देतात. म्हणूनच खासदारकी पदापेक्षा आंबेडकरांचा नातू पद मोठे आहे.

२०२४ च्या निकालात खासदार होऊन राज्य करायला निघालेल्या मध्ये बहुसंख्य हिंदू बहुजन ओबीसी,एस सी,एस टी,आदिवाशी,अल्पसंख्यक मुस्लिम आहेत.त्यांना राखीव गुलाम म्हणून मान्यता आहे.त्यांचा कोणी मान सन्मान ठेवतो काय?. देशाच्या सर्वोच्च पदी एक आदिवाशी विधवा महिला आहे. तिला नवीन वस्तूचे भूमिपूजन,उद्घाटन करण्याचा संविधानिक अधिकार होता,पण मनू ची आचार संहिता ते नाकारते त्या विरोधात कोणी आवाज उचलला?.भाजपा,कॉंग्रेस,शिवसेना,राष्ट्रवादी,हे एकाच आईच्या विचारधारेची चार मुले आहेत जी फक्त सत्ता संपत्तीसाठी सतत भांडत असतात आणी आलटून पालटून सत्तेचा भोग घेत असतात. विशेष म्हणजे हिंदू सुवर्ण समाज म्हणून ते कधी ही एकत्र येऊ शकतात.आंबेडकरी समाजाचे काय?.

आंबेडकरी विचाराचा समाज जागरूक आहे. संघर्ष करण्यासाठी तो नेहमीच तयार असतो. त्याच्याकडे स्वताचे नुकसान करून घेण्यासारखे काहीच नाही.त्यामुळेच त्यांचे आज पर्यन्त कधीही कोणी सरळ नुकसान करू शकले नाही.त्यांची वैचारिक ताकद आहे मरण्याची आणी मारण्याची,लढून न्याय मिळवून घेण्याची.मागीतल्याने मिळत नाही आणि संघर्षा शिवाय पर्याय नाही. हे तो लहानपणा पासूनच शिकतो. दुःख तर त्याच्या पाचविला पूजलेले असते. ते पंचविण्याची शक्ति त्याला निसर्गाने कायम दिली आहे. आणी प्रस्थापितांच्या हातून सदैव त्याचे आर्थिक सामाजिक शोषण करण्याची संधी मनूस्मृती ने दिली आहे. त्याविरोधात तो हजारो वर्षापासून संघर्ष करतो आहे.एक दोन लोकसभा विधानसभा निवडणूक हारला म्हणून काय फरक पडणार आहे.बाळासाहेब आंबेडकर सारखा सूर्यपुत्र ज्याच्या एका कॉल वर केंद्रात कोणतंही मंत्रिपद घेऊ शकतो तेही कुठल्याही पक्षात.तो माणूस रात्रंदिवस तुमचं अस्तित्व निर्माण करण्यासाठी हार्ट पेशंट असूनही,ऊन वारा पावसात भिजून झटतो आहे आणी आपण खुशाल गुलामी पत्कारत आहात.त्यामुळेच प्रकाश आंबेडकर लोकसभा निवडणूक हारले नाही तर बहुसंख्य असलेला समाज हारला आहे.बाळसाहेबांसाठी खासदारकी पदापेक्षा आंबेडकरांचा नातू पद मोठे आहे.भविष्यात बहुसंख्य मागासवर्गीय समाजाने विशेष महार,बौद्ध यांनी कोणाच्या बाजूने उभे राहिले पाहिजे हे ठरवले पाहिजे. त्यांच्यावर अन्याय अत्याचार झाला तर कोण धाऊन येणार आहे?. निवडून दिलेला आमदार खासदार की आंबेडकरी विचारांचा कार्यकर्ता नेता आणि नातू याचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे.

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३३८५९,भांडुप,मुंबई.**

# निसर्गाने मोफत दिलेलं नष्ट करू नका, त्यात भर घालून ते वाढवा

माझ्या आजोबांनी लावलेल्या आंब्याच्या झाडाचे आंबे आज ही आम्ही गावी गेलो की हक्काने खातो.त्यांनी ते आंब्याचे झाड मुलासारखे वाढविले.त्यावर हक्क अधिकार आज आजोबांची मुल नातु दाखवतात.पण आजोबा नंतर बापाने लावलेले एक ही झाड नाही.आम्ही गावातून घरातुन विद्यार्थी म्हणून शिक्षणासाठी बाहेर गेलो. शिक्षणपूर्ण झाल्यावर नंतर नोकरी मिळाली. त्यामुळे गाव वावर यांच्याशी जुळणार नातं कमी कमी होत गेले.पाणी वाचवा,पाणी अडवा,पाणी जिरवा ह्या म्हणी ग्रामीण भागात सार्वजनिक जागी भिंतीवर लिहलेल दिसते.गावातील लोक त्याचे पालन ही करतात. झाडे लावतात आणि त्यांची फळे ही खातात. मुंबई सारख्या शहरात पाणी आडवा पाणी जिरवा हा प्रकार नसतो. तर योजना आडवा निधी जिरवा असा प्रकार चालतो. उन्हाळ्यात म्हणजे एप्रिल,मे मध्ये उन्हाणे माणसांना प्रचंड उकाळा उष्णता सहन होत रोड वर उभे राहण्यासाठी कुठे ही झाड नाही. उष्णता आणि पिण्याचे पाणी कपात ही शहरतील लोकांची दरवर्षी मोठी समस्या असते.घरात कार्यालयात आणि गाडीत सुद्धा एसी असल्या शिवाय मानस जगू शकत नाही.त्यांना ऑकसीजण मोफत मिळत नाही. तेव्हा त्यांना झाडाचे महत्व आठवते. शाळा,कॉलेज मध्ये शिकवलेले झाडाचे महत्व आता कुठे कळते. पण वळत नाही.

मुंबईतील निसर्ग निर्मित डोंगर व डोंगरातील झाडे बिल्डरनी नष्ट केले.त्यामुळे सर्वच ठिकाणी सिमेंट कॉनकरेटचे जंगल निर्माण झाले आहे.

निसर्ग सांगतो डोंगर आणि झाडाशिवाय जमीनीत पुरेसे पाणी साठवणे अशक्य आहे.

डोंगर हे जमिनीतील पाणीसाठ्याचे बाह्य कवच असते. उन्हाळ्यात डोंगराचे बाह्य आवरण तापते.मात्र भूपृष्ठापर्यंत उष्णता पोहचू न शकल्यामुळे पाण्याचे बाष्पीभवन होत नाही.या उलट डोंगर फोडला तर उष्णता थेट पोहचते व डोंगराच्या पोटातील ओलावा संपुष्टात येतो.पाणी जमिनीत दोन प्रकारे साठले जाते. एक मृत साठ्याचे पाणी.दुसरे जिवंत साठ्याचे पाणी.मृत साठ्याचे पाणी हे दहा फुटावर पाझरते तर जिवंत साठ्याचे पाणी दहा ते १०० व त्यापेक्षा अधिक पाळीवर आढळते.जेंव्हा पाऊस पडतो तेंव्हा नदी नाल्याचे पाणी मृत साठ्याच्या स्वरूपात जमिनीत साठले जाते.जे कि एकदा उपसले कि संपून जाते. आणि जोपर्यंत ओढे,ओघळ वहात असतात तोपर्यंतच विहीर व बोअरला पाणी असते.तर जिवंत साठ्याचे पाणी आज तरी भूगर्भातून संपलेले आहे. कारण जिवंत पाणी खोलवर जाण्यासाठी नैसर्गिक यंत्रणा हवी असते.एक पाण्याचा थेंब खडकातून पाझरून भूगर्भात जाण्याठी एक वर्षाचा कालावधी लागतो.म्हणजेच दहा फुटावर जाण्याठी दहा वर्ष लागतात.एक झाड एका दिवसाला ५० फुटावर दहा लिटर पाणी जमिनीत घेऊन जाते. कारण झाडं हे जमिनीच्या वर जेवढ्या उंचीपर्यंत असेल तेवढीच खोलवर त्याची मुळे असतात.म्हणून झाडं हे निसर्गाची बिनाखर्चाची पाईपलाईन आहे,

एक कडूनिंबाचे झाडं दहा हजार लिटर पाणी एकुण पावसाळ्यात जमिनीत घेऊन जाऊ शकते.याचा अर्थ आपल्या परिसरात किमान ३० झाडं निंब,चिंच,जांबळ,अंबा, मोह,अर्जुन या वर्गातील नक्कीच असतील.म्हणून मृत साठ्याचे पाणी पाझरत रहात असावे.एक वडाचे किंवा पिंपळाचे मोठे झाडं एका हंगामासाठी एक कोटी लिटर पाणी जमिनीत घेऊन जाते.आणि ते ही पन्नास फुटाच्या ही खाली. वडाची व पिंपळाचे मुळे पाषाणालाही भेदून ८०० ते १००० फुटावर पोचतात.एक कोटी लिटर म्हणजे एका विहीरीचा शंभर वेळा उपसा करावा एवढे पाणी. याचा गणितीय हिशोब सांगायचा झाला तर ३५ एकर शेतीचे रब्बी हंगामाचे भरणपोषण होते आणि वर्षभर बागायतीसाठी १५ एकरला पुरेल एवढे जिवंत साठ्याचे पाणी एक वड किंवा पिंपळ पुरवतो.म्हणून आपल्या शेताच्या शेजारी मोकळी पडीक जागा असेल तर किमान एक असा महावृक्ष लावा.आपण एक बोअरवेलसाठी एक लाख खर्च करतो. एका विहीरीसाठी पाच लाख खर्च करतो.पण पाण्याचा कुठलीच शाश्वती नाही'. कारण आपली नियत ही धुर्त असते, डोंगर संपुष्टात आणण्याची,डोंगारावरील झाडं तोडण्याची व वणव्यात जाळून संपवून बोडके करायची म्हणून पाणी तरी कुठून येणार? पाण्याचे दुर्भिक्ष हे मानव निर्मित आहे. देवाला किंवा निसर्गाला दोष देण्यात अर्थ नाही.खरे दोषी आपण मानव व आपला स्वार्थ आहे.

हवा ही ऊर्जा आहे.
पाणी हे अमृत आहे
तर माती ही जननी आहे.
तर झाडं हे जीवनदायी आहेत.

झाड नसेल तर हवा रोगट होते. पाणी विषासमान होते आणि माती वांझ होवून शापीत होते.म्हणूनच झाडांचं मूल्य समजून घ्या.आणि दहा रूपयाचं फक्त एक झाडं शेत असेल तर शेतात नाहीत तर माळरानावर, डोंगरावर कुठे ही जगविण्याची जबाबदारी म्हणून झाड लावा.या शिवाय दुसरा कुठलाच पर्याय शिल्लक नाही.तुम्ही गावाचे, शहराचे,देशाचे,समाजाचे आणि स्वहिताचे जर काही देणं लागत असाल तर एवढचं साध काम करा. झाडं मानसाचं मन,मस्तिष्क व जीवन हिरवंगार करत असतात.हे एक सदैव लक्षात असु द्या.झाडांची पाणी पाठवण्याची व वाहण्याची क्षमता त्यांच्या वयावर व प्रकारावर अवलंबून असते.झाडाचे महत्व जाणाल तर तुमचं आस्तित्व वाढेल.मी गाव सोडून मुंबई शहरात आलो तरी गावाकडील वेगवेगळ्या ऋतुत हंगामात गावी जाऊन त्याचा उपभोग घेत असतो. म्हणजे मुंगाच्या चवलीच्या शेंगा खाण्यासाठी,किंवा हुरडा खाण्यासाठी,बोर खाण्यासाठी,आंबे,चिंचा खाण्यासाठी त्या त्यावेळी गावी गेलेच पाहिजे.मुंगफळीच्या शेंगा,तुरीच्या शेंगा खाण्यासाठी त्या त्या ऋतूमध्ये गेलेच पाहिजे आणि मुलांना सुद्धा गावाकडे नेले पाहिजे.अनेक मुलांना मुंगफळीच्या शेंगा कुठे येतात.तसेच तुरीच्या शेंगा कुठे लागतात हे शहरातील मुलांना माहिती नसते.म्हणूनच प्रत्येक ऋतुत मुलांना दोन दिवसासाठी गावी नेलेच पाहिजे.आपण स्वता निसर्गाने मोफत दिलेलं नष्ट करू नये,मुलांना त्यात भर घालण्यासाठी तयार केले पाहिजे.

मी सेवा निवृत होण्या अगोदर माले मुळशी तालुक्यात सहली साठी गेलो होता. अनेक इंजिनियर अधिकारी सोबत होते. त्यांना घेऊन शेतावर गेलो. तिथे बटाटा पेरल होता ते हिरवागार शेत दाखवून सर्वांना विचारले हे कोणते पीक आहे. मुंबई शहरात राहणाऱ्या कोणालाच सांगता आले नाही. मग मी त्यांना सांगितले की हे बटाटे आहेत. मग स्थानिक ८४ वर्षाच्या शेतकऱ्यांची छोटीशी मुलाखत घेतली.त्याची छायाचित्र सोबत देत आहे.उन्हाळ्यात स्वतचे रक्षण करायचे असेल तर प्रत्येकानी झाडे लावली पाहिजे.आता पाऊसाळा सुरू होत आहे.म्हणूनच निसर्गाने मोफत दिलेलं नष्ट करू नका, त्यात भर घालून ते वाढवा.

**सागर रामभाऊ तायडे**
**९९२०४०३८५९, भांडुप,मुंबई.**

# ट्रॉसिटी प्रकरणातील आरोपीं मोकाट,उलट पोलिसांनी बौद्ध समाजावरच दाखल केले दरोड्याचे गुन्हे

## खोटे गुन्हे रद्द करा अन्यथा समाजाचा आंदोलनाचा इशारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

रळी पासून जवळच असलेल्या मौजे दाऊतपूर येथील बौद्ध समाजाच्या तरुणांना जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण झाल्याची घटना पंधरा दिवसापूर्वी घडली होती. याप्रकरणी आरोपीविरुद्ध अट्रॉसिटीसह इतर गुन्हे दाखल करण्यात आले होते. या ट्रॉसिटी प्रकरणातील सर्व आरोपी अद्याप मोकाट फिरत आहेत. परंतु पोलिसांनी आरोपीशी संगणमत करून उलट बौद्ध समाजातील तरुणावरच आणि सामाजिक कार्य करणाऱ्या शिक्षकावर खोटे ३९५ यासारखे दरोड्याचे व इतर गुन्हे दाखल केल्याने बौद्ध समाजात संतापाची लाट उसळली आहे. सदर खोटे गुन्हे रद्द करावे अन्यथा पोलिसांच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा बौद्ध संघर्ष समिती, वंचित बहुजन आघाडी व इतर आंबेडकरवादी पक्ष आणि संघटनांनी दिला आहे. तर गेले दोन दिवसापासून दाऊतपूर येथील बौद्ध समाजाच्या महिला व पुरुष उपविभागीय कार्यालयासमोर झालेल्या अन्यायाविरुद्ध न्याय मागण्यासाठी उपोषणाला बसलेल्या आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की परळी तालुक्यातील दाऊतपूर येथे दिनांक २४ मे रोजी बौद्ध तरुणांना जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण करण्यात आली होती. याप्रकरणी आकाश अश्रुबा मुंडे यांच्या फिर्यादीवरून त्यावेळी मारुती उत्तम काचगुंडे, ज्ञानदेव बाबुराव काचगुंडे ,खंडू उत्तम काचगुंडे, वैजनाथ बाबुराव काचगुंडे यांच्या विरोधात ट्रॉसिटीसह इतर गुन्हे दाखल करण्यात आले होते. या प्रकरणातील आरोपींना परळी ग्रामीण पोलिसांनी अद्याप पर्यंत अटक केलेले नाही. यातील मारूती उत्तम काचगुंडे यांच्यावर ३०२ सारखा गंभीर गुन्हा असल्याचे समजते ही गंभीर बाब आहे. त्याला पोलिसांचा अभय आहे की काय असा संशय



निर्माण होत आहे.

दरम्यान आरोपींशी संगणमत करून उलट दिनांक ९ जून रोजी मारहाण झालेल्या बौद्ध युवकावरच परळी ग्रामीण पोलिसांनी ज्ञानेश्वर बाबुराव काचगुंडे यांच्या फिर्यादीवरून कलम ३९५, ३४१, ३२४, ३२३, ५०४, ५०६ भादवी अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. याप्रकरणी न्याय मिळावा म्हणून दाऊतपूर येथील बौद्ध समाजाच्या अनुसया भालेराव, सुमित सुरवसे ,आशाबाई सुरवसे, सुनीता मुंडे, मंदाबाई मुंडे, बाबुराव मुंडे, लंकाबाई मुंडे, पूजा मुंडे, शंकर मुंडे आदी बौद्ध समाजाचे महिला, पुरुष गेल्या दोन दिवसापासून परळी उपविभागीय कार्यालयासमोर उपोषणाला बसले आहेत. तसेच दाखल करण्यात आलेले खोटे ३९५ चे गुंन्हे मागे घेण्यात यावेत, ट्रॉसिटी प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी व दाऊतपूर येथील बौद्ध समाजाला पोलीस संरक्षण द्यावे आदी प्रमुख मागण्यासह उपोषणाला बसले आहेत .दरम्यान या प्रकरणी दाऊतपूर ट्रॉसिटी प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करा, दाखल करण्यात आलेले ३९५ व इतर बहुजन समाजावरील गुन्हे रद्द करावे अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा एका निवेदनाद्वारे या बौद्धजन संघर्ष समिती,व वंचित बहुजन आघाडीच्या वतीने परळी उपविभागीय अधिकारी तसेच परळी तहसीलदारांन देण्यात आले आहे.

# नीट परीक्षेत घोळ घालणाऱ्या विद्यार्थी आणि पालकांवर गुन्हे दाखल करून त्यांना शैक्षणिक अपात्र ठरवा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

इसवी सन २०२४ मध्ये नीट परीक्षेत महाराष्ट्र व्यतिरिक्त अन्य राज्यांमध्ये परीक्षा घेणाऱ्या सदस्यांना मॅनेज करून मोठा घोळ घालण्यात आला आहे. यामुळे कष्ट करून मार्क घेणाऱ्या गोरगरीब विद्यार्थ्यांवर मोठा अन्याय झाला आहे. हा प्रकार झाला आहे. पैसा असणाऱ्या बलाढ्य शक्तीनी हा प्रकार केला असून ज्या परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांना एक सारखे गुण आणि ग्रेसमार्क देण्यात आले आहेत त्या परीक्षा केंद्रावरील नीट ची पुनपरीक्षा घेऊन देशातील गोरगरीब विद्यार्थ्यांना न्याय द्यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा लोकशाही पत्रकार संघाचे प्रदेश कार्याध्यक्ष



आयुब पठाण यांनी केली आहे.

देशात हफ्तेखोरी, लाचखोरी मोठ्या प्रमाणात बळवली आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना सुद्धा विठीस धरण्याचे काम प्रशासनाकडून होत असून लाखोंची संपत्ती असणाऱ्या शक्तीने देशातील विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविणाऱ्या नीट परीक्षेत मोठा घोळ केला आहे. यामुळे गोरगरीब आणि कष्टकरी विद्यार्थ्यांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. महाराष्ट्र व्यतिरिक्त अन्य राज्यांमध्ये नीट परीक्षेचा पेपर फोडून मोठ्या प्रमाणात गुणांची गोळाबेरीज करण्यात आली आहे. अपेक्षित नसणारे गुण विद्यार्थ्यांना प्राप्त झाले असल्याने देशातील गोरगरीब आणि कष्टकरी विद्यार्थी हदबल झाले आहेत. ज्या केंद्रामध्ये असा प्रकार झाला आहे त्या केंद्रातील परीक्षा पुन्हा घेण्यात येऊन देशातील डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी आयुब पठाण यांनी केली आहे.

### वंचित बहुजन आघाडीच्या निवेदनाची दखल

# तात्काळ स्मशानभूमी मधील लाईट दुरुस्त करताना नपचे कर्मचारी बालासाहेब जगतकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

वंचित बहुजन आघाडीच्या निवेदनाची दखल घेऊन नगरपालिकेने तात्काळ परळी शहरातील दलितांच्या स्मशानभूमी मधील लाईट चालू करून देत असताना ची माहिती देताना वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्ध प्रमुख तथा साप्ताहिक मानपत्र चे संपादक बाळासाहेब जगतकर यांनी दिली आहे याबाबत सविस्तर माहिती अशी की परळी शहरातील भीम नगर येथील शांतीवन स्मशानभूमीतील लाईट व्यवस्था चालू करण्यात यावी जगतकर गल्ली येथील पडलेला खड्डा दुरुस्त करण्यात यावा



व शंकर साळवे ते सखाराम जगतकर व कुमार जगतकर यांच्या घरापर्यंत पाण्याची पाईपलाईन टाकून पाण्याची व्यवस्था करण्यात यावी अशा प्रकारचे लेखी निवेदन परळी नगरपालिकेला दिनांक १० ६ २०२४ रोजी दिले असता त्याची दखल म्हणून आज दिनांक १३ ६ २०२४ रोजी परळी नगरपालिकेने दलितांच्या स्मशानभूमी मधील लाईट चालू करण्याच्या कामाची सुरुवात केली असून लवकरच जगतकर गल्ली येथील खड्डा ही बुजवण्यात येणार असून पाईपलाईन ही टाकून पाण्याची व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती ही संबंधित अधिकाऱ्यांनी दिली असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख तथा साप्ताहिक मानपत्र चे संपादक बालासाहेब जगतकर यांनी प्रसिद्धी पत्रकार द्वारे दिली आहे.

# जालन्याचे जितेंद्र अग्रवाल यांची ऐतिहासिक कामगिरी

### दक्षिण आफ्रिकेत कॉम्रेड मॅरेथॉन यशस्वीरित्या पूर्ण



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**डर्बन (द. आफ्रिका)**

जालना येथील व्यावसायिक व धावपटू जितेंद्र अग्रवाल यांनी दक्षिण आफ्रिकेत डर्बन येथे ९ जून रोजी कॉम्रेड मॅरेथॉन ही ८७ किलोमीटरची स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण करून इतिहास घडवला आहे. या जगप्रसिद्ध व प्रतिष्ठित अल्ट्रा मॅरेथॉनमध्ये धावणारे जालना येथील पहिले धावपटू होण्याचा मान ५३ वर्षीय जितेंद्र अग्रवाल यांनी मिळवला आहे. १२ तासांत ८७ किलोमीटर धावण्याचे लक्ष्य त्यांनी ११ तास ४२ मिनिटे व ३२ सेकदांत पूर्ण करून अनोख्या मनोबलाचे दर्शन घडवले आहे. या स्पर्धेत धावणे व ती पूर्ण करणे हे जगभरातील धावपटूंचे स्वप्न असते. याच डर्बन शहरात महात्मा गांधी यांचे काही काळ वास्तव्य होते हे विशेष. या स्पर्धेसाठी जितेंद्र अग्रवाल जालना येथून ४ जून रोजी मुंबई व तेथून ५ जून रोजी सकाळी ४.३० वाजता डर्बनला विमानाने निघाले आणि संध्याकाळी ७ वाजता डर्बन येथे पोहचले. त्यांच्यासोबत महाराष्ट्रातून जाणारे ४० सदस्य होते. अग्रवाल यांचे सातारा येथील प्रशिक्षक शिव यादव यांच्यासोबत हा संघ डर्बनला पोहचला. ६ जून रोजी सर्वांनी आराम केला. ७ व ८ जून रोजी दररोज अर्धा तास धावण्याचा सराव केला. ९ जून रोजी सकाळी ५.३० वाजता स्पर्धा सुरू होणार होती. त्यामुळे हे सर्व जण सकाळी ४.३० वाजता स्टार्ट पॉइंटला पोहचले. जितेंद्र अग्रवाल यांनी सांगितले की, तेथील वातावरण अतिशय आल्हाददायक होते. रस्त्याच्या दुतर्फा लोक आम्हाला शुभेच्छा देत होते. संपूर्ण डर्बन शहरातील नागरिक मोठ्या संख्येने तेथे आले होते. ते त्यांच्या भाषेत गाणी गात होते आणि त्यामुळे वातावरणात नवचैतन्य संचारले होते. पहाटे ठिक ५.३० वाजता स्पर्धा सुरू झाली आणि संध्याकाळी ५.३० वाजता पीटरमेरीबर्ग येथे संपन्न झाली. धावताना पूर्ण ८७ किलोमीटर मार्गावर दोन्ही बाजूंनी लोक धावपटूंना प्रोत्साहन देत होते. भारतात जसा गणेशोत्सव उत्साहात साजरा होतो त्यापेक्षाही मोठा सण दक्षिण आफ्रिकेतील लोक कॉम्रेड मॅरेथॉनला साजरा करतात. पूर्ण मार्गावर लोक धावपटूंना पाणी, ज्यूस व खाद्यपदार्थ देत राहतात. या स्पर्धेत १८०० मीटर चढाईचा मार्ग असल्यामुळे पूर्ण चढ चढून पुन्हा उतारावर धावायचे होते. या मार्गावर आजूबाजूचे निसर्गसौंदर्य अत्यंत अविस्मरणीय होते. हिरवेगार, डेरेदार वृक्ष, हिरवळ आणि पक्ष्यांचा किलबिलाट आमचा उत्साह वाढवत होता. ही स्पर्धा केवळ ईश्वराच्या कृपेने व जालनेकरांच्या शुभेच्छांमुळेच पूर्ण करू शकलो, असेही जितेंद्र अग्रवाल यांनी नम्रपणे नमूद केले. स्पर्धेत यश मिळवून त्यांनी परतीचा प्रवास सुरू केला असून १३ जून रोजी ते जालना येथे परतणार आहेत.

**वेदनांवर केली मात**

स्पर्धेच्या अखेरच्या टप्प्यात त्यांच्या उजव्या पायाच्या नसा आखडल्याने त्यांना प्रचंड वेदना होऊन धावणे अशक्य झाले होते. परंतु तरीही हार न मानता श्री गजानन महाराजांचे नामस्मरण करीत ते पुढे गेले आणि जवळच डाव्या बाजूला त्यांना डॉक्टरांचे पथक भेटले. त्यांनी तत्काळ अग्रवाल यांच्या पायाला विशेष पट्ट्या बांधल्या आणि लगेच वेदना थांबल्या. अग्रवाल यांनी मग मागे वळून न पाहता वेळेआधीच स्पर्धा पूर्ण करून भारताचा तिरंगा ध्वज मानाने फडकवला.

# सरकारच्या आश्वासनानंतर आंदोलन १ महिन्यासाठी स्थगित जरांगे पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

आज शंभूराज देसाई यांच्या नेतृत्वात सरकारचे शिष्टमंडळ मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करण्यासाठी आले होते. यावेळी सगेसोयरे आणि इतर सर्व मागण्यांसंदर्भात सरकारला एक महिन्याची मुदत द्यावी अशी विनंती शिष्टमंडळाने केली. मनोज जरांगे पाटील यांनी सरकारची विनंती मान्य करीत सरकारला एक महिन्याची मुदत दिली आहे. जर सरकारने १३ जुलैपर्यंत अंमलबजावणी केली नाही तर मात्र निवडणुकीच्या रिंगणात उतरून सर्वांना हिसका दाखवणार. असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. आंतरवाली सराटीतील बैठकीचा सारांश सरकारी कर्मचारी निवडणूक कार्यात असल्यामुळे, दोन महिने सगेसोयरेच्या हरकतींची स्क्रूटिनी करण्यास वेळ भेटला



नाही.काहीही झाले तरी सरकार सगेसोयरेचा प्रश्न सोडवणारसरकारने जे १०% डएइउ आरक्षण दिले, त्याचे १००% श्रेय मनोज जरांगे पाटील यांचेच आहे. निवडणुकांमुळे गुन्हे मागे घेण्यासाठी बैठक घेता आली नाही मुख्यमंत्री शिंदे यांनी रात्री १ वाजता फोन करून मनोज जरांगे यांची भेट घेऊन चर्चा करण्यास सांगितले उद्याच मराठा उपसमितीची बैठक घेऊन सर्व मागण्यांच्या संदर्भात पाठपुरावा जाईल सर्व मागण्या पुन्हा एकदा लिहून घेण्यात आल्या एक महिन्यात सर्व मागण्याची पूर्तता केली जा ईल असे आश्वासन देण्यात आले, सगेसोयरेंच्या हरकती स्वीकारायच्या किंवा नाही हा अधिकार सरकारचा आम्ही सरकारला दिलेल्या व्याख्येप्रमाणेच सगेसोयरे लागू झाले पाहिजे सरकारला ५७ लाख कुणबी नोंदी सापडल्या आहेत, याचा आधार घेऊन मराठा आणि कुणबी एकाच आहेत असा अध्यादेश काढावाविद्यार्थ्यांचे ॲडमिशन सुरु आहेत. तुम्ही आधीच अंमलबजावणी केली असती, तर समाजाचे करोडो रुपये वाचले असते ज्यांची कुणबी नोंद मिळाली त्यांना प्रमाणपत्र आणि प्रमाणपत्र दिले त्यांना काही जातीवादी अधिकाऱ्यांमुळे कास्ट व्हॅलिडिटी मिळत नाही. एक महिन्यात आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर विधानसभेला २८८ जागा लढवणार लोकसभेला कोणाची नावे घेतली नाहीत, विधानसभेला नावे घेऊन पडणार यापुढे आंदोलन करण्याची वेळ येणार नाही अशी आशा आहे. जर आलीच तर अंतरवाली सराटी येथेच करावे असा आग्रह नको अंतरवाली लाठीचार्जमध्ये ज्या मराठा माउलीला सर्वात जास्त मार लागला होता, त्यांच्या हाताने पाणी पिऊन मनोज दादांनी उपोषण सोडले.

# आषाढी वारीसाठी जाणाऱ्या दिंड्यातील वारकऱ्यांना सर्व मुलभूत सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी काटेकोर नियोजन करा – जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर । प्रतिनिधी**


पांडुरंगाच्या दर्शनासाठी जिल्ह्यातील अनेक दिंड्यासह परजिल्ह्यातील दिंड्या आपल्या जिल्ह्यातून आषाढी वारीसाठी पंढरपुरकडे जातात. या दिंड्यातील वारकऱ्यांना पिण्याचे शुद्ध पाणी, वीज, राहण्याची व्यवस्था, फिरते स्वच्छतागृह यासारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिले. आषाढी वारीच्या नियोजनाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.त्याप्रसंगी जिल्हाधिकारी श्री सालीमठ बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.पंकज जावळे, अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील, संत निळोबाराय पालखीचे अध्यक्ष अशोकराव सावंत, मानाच्या पालख्यांचे प्रमुख तसेच जिल्ह्यातील दिंड्यांचे प्रमुख उपस्थित होते. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ म्हणाले की, पांडुरंगाच्या दर्शनासाठी जिल्ह्याबरोबरच परजिल्ह्यातील अनेक दिंड्या आपल्या जिल्ह्यातून जातात. या दिंड्यामधील वारकऱ्यांना मुलभूत सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत. दिंड्यांच्या मुक्कामाची ठिकाणे ठरलेली आहेत. ज्या गावात अथवा शहरामध्ये या दिंड्या मुक्कामी थांबणार आहेत त्या ठिकाणी वारकऱ्यांची मुक्कामाची व्यवस्था करण्यात यावी. वारकऱ्यांना दिंडी मार्गावर शुद्ध पिण्याचे पाणी, शौचालयाची व्यवस्था करण्याच्या सुचनाही जिल्हाधिकारी श्री सालीमठ यांनी यावेळी दिल्या. दिंड्यामधून हजारो वारकरी पायी चालत असतात. अश्या वेळी वारकऱ्यांचे आरोग्य चांगले राहील यादृष्टीने अधिक काळजी घेणे गरजेचे आहे. प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी तसेच जागोजागी आरोग्य पथके तैनात ठेवण्यात यावीत. या पथकामध्ये पुरेश्या प्रमाणात मनुष्यबळ तसेच औषधीसाठा उपलब्ध ठेवण्यात यावा. आवश्यकतेनुसार रुग्णास तातडीने उपचार मिळावेत यासाठी अधिक प्रमाणात रुग्णवाहिका उपलब्ध ठेवण्यात याव्यात. प्रथमोपचार किट तयार करून ती प्रत्येक दिंड्यामध्ये देण्यात यावी.आरोग्य सुविधेमध्ये कुठलीही उणीव भासणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी संबंधित विभागांना दिल्या. वारकरी पायी चालत असलेल्या मार्गावर वाहतुकीचे नियमन करण्याबरोबरच वारकऱ्यांना कुठलाही त्रास होऊ नये यासाठी दिंड्यासोबत पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवावा. तसेच दिंड्या ज्या ठिकाणी मुक्कामी राहतील तेथेही पोलीस कर्मचारी उपस्थित राहतील दृष्टीने नियोजन करण्यात यावे. सध्या पावसाचे दिवस आहेत. वारकऱ्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी पावसाचे पाणी साचण्याचे अनेक प्रकार घडतात. त्यामुळे या पाण्याचा निचरा होऊन पावसाच्या पाण्यापासनु वारकऱ्यांचे संरक्षण होण्याच्यादृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच मुक्कामाच्या ठिकाणी मुबलक प्रमाणात पाण्याचे टँकर उपलब्ध करुन देण्यात यावेत.

# तलाठी,ग्रामसेवक,कृषी सहाय्यक व वायरमन यांनी गावागावात जाऊन जनतेचे प्रश्न सोडवावेत

## आढावा बैठकीत आ.बाळासाहेब आजबे यांच्या कर्मचाऱ्यांना सूचना

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के



सर्वसामान्य जनतेची काम हे मोठमोठे अधिकारी यांच्याकडे नसून ती तलाठी ग्रामसेवक कृषी सहाय्यक वायरमन आरोग्य सेवक यासारख्या कर्मचाऱ्यांकडे असतात त्यामुळे या कर्मचाऱ्यांनी फिल्डवर जाऊन गावागावात पारावर बसून सामान्य जनतेचे प्रश्न सोडवावेत कोणालाही वेठीस धरू नये ज्या ठिकाणी अडचणी येतील त्या अडचणी आम्हाला तात्काळ कळवाव्यात सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील असल्याचे आमदार बाळासाहेब आजबे यांनी आष्टी तहसील कार्यालयात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

आष्टी तहसील कार्यालयांमध्ये खरीप हंगाम २०२४ व इतर बाबींचा आढावा बैठक आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या अध्यक्षते खाली घेण्यात आली यावेळी जिल्हा परिषद सदस्य सतीश आबा शिंदे तहसीलदार गायकवाड नायब तहसीलदार बाळदत्त मोरे, ज्येष्ठ नेते काकासाहेब शिंदे, सावता ससाणे,यांची प्रमुख उपस्थिती होती ,यावेळी पुढे बोलताना आमदार आजबे म्हणाले की मतदारसंघांमध्ये मोठ्या प्रमाणात एमआरजिएस ची कामे सुरू आहेत कुठलेही काम बंद राहणार नाही याची खबरदारी प्रशासनाने घेतली पाहिजे. वैयक्तिक लाभाच्या योजना ह्या सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचण्याचे काम संबंधित कर्मचारी वर्गाचे आहे गावागावात या वेगवेगळ्या योजना विषयी माहिती देणे गरजेचे आहे एमआरएस च्या माध्यमातून शेतकऱ्यांनी फळबाग लागवडीचा फायदा घ्यावा व फळबाग लागवड क्षेत्र कसे वाढेल याकडेही कृषी अधिकारी व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी लक्ष देणे गरजेचे आहे वृक्ष लागवड ही मोठ्या प्रमाणावर कशी वाढवता येईल यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, गाय गोठा ही योजना एमआरइजीएस मधून चालू करण्याच्या सूचनाही यावेळी आमदार बाळासाहेब आजबे यांनी गटविकास अधिकारी यांना दिल्या जनावरांचे टॅगिंग पूर्ण करून घ्याव्यात व संभाव्य लशीबाबतचे लसीकरण करून जनावरे चे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने जनजागृती करावी ,जलसंधारन कामा बाबत बोलताना आमदार आजबे म्हणाले की १.६८ टीएमसी चे शिंपोरा येथून पाईपलाईनचे काम १८ किलोमीटर पूर्ण झाले आहे एक पंप हाऊस चे काम पूर्ण झाले असून एक वर्षाच्या आत काम या योजनेचे काम पूर्ण होणार आहे त्यामुळे या विभागातील अधिकाऱ्यांनी या योजनेतील कडे संपूर्ण लक्ष देणे गरजेचे आहे खुंटेफळ साठवण तलाव क्षेत्रातील ज्या मागील शेतकऱ्यांना ज्या दराने मोबदला मिळाला आहे त्याचप्रमाणे मोबदला सर्व शेतकऱ्यांना आता ही मिळाला पाहिजे यासाठी आपण शासन स्तरावर प्रयत्न करत आहोत याबाबत कोणी तुझा भाव करत असेल तर त्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचे आदेशही आमदार बाळासाहेब आजबे यांनी या बैठकीत दिले,उपजिल्हा रुग्णालयाची जागा विषय मार्गी लागला असून लवकरच ११५ कोटी रुपये किमतीच्या उपजिल्हा रुग्णालयाची इमारतीचे काम सुरू होणार आहे, २०२४ खरीप हंगामाच्या बाबतीत कृषी विभागाने सतर्क राहणे गरजेचे आहे शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी समजून घेऊन त्यांना योग्य बियाणे व खते कसे वापरावीत या संबंधित गावागावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे गरजेचे आहे शेतकऱ्यांना कोणतेही बियाणे व खते कमी पडणार नाही यासाठी कृषी विभागाने प्रयत्न करावेत यापुढे खतांचा रॅक कायमस्वरूपी अहमदनगर येथे राहणार असल्यामुळे खते कमी पडणार नाहीत कृषी विभागांतर्गत १०६९ शेतकऱ्यांना साडेचार कोटीचा लाभ विविध योजनेतून झाला असल्याचेही यावेळी सांगण्यात आले यावेळी तहसील,पंचायत समिती, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, कृषी, विभाग वन विभाग ,पोलीस स्टेशन, गटशिक्षणाधिकारी ,बाल विकास अधिकारी,बँक , जलसंधारण, लघुपाटबंधारे या सर्व विभागातील अधिकारी उपस्थित होते सर्व विभागातील अधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती देत कामकाजाबाबत आढावा सांगितला सर्व अधिकाऱ्यांना आमदार बाळासाहेब आजबे यांनी सर्वसामान्य जनतेचे काम कोणीही आडवु नका काम आडवल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाईल सर्वसामान्य जनतेला त्रास होईल असे कोणीही वागू नये सामान्यांच्या तक्रारी दूर करण्यासाठीच आपली नेमणूक केली आहे आपले काम प्रामाणिकपणे करावे अशा सूचनाही यावी शेवटी आ, बाळासाहेब आजबे यांनी सर्व कर्मचाऱ्यांना दिल्या.

# उमरगा सकल मराठा समाजाचे जरांगे पाटील यांच्या उपोषणास पाठींबा देत विवीध मागण्यासाठी निवेदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरगा । राहील पटेल



उमरगा तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे-पाटील यांनी अंतरवाली सराटी या ठिकाणी महाराष्ट्रातील सर्व मराठ्यांना ओ.बी.सी. प्रवर्गातून ५०% च्या आत शाश्वत आरक्षण मिळावे या मागणीसाठी दि .८ रोजी पासून चालू केलेल्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी व अन्य मागण्यासाठी दि .१३ रोजी तहसीलदार गोविंद येरमे यांना निवेदन देण्यात आले .

देण्यात आलेल्या निवेदनात म्हंटले आहे की श्री. मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटी या ठिकाणी महाराष्ट्रातील सर्व मराठ्यांना ओ.बी.सी. प्रवर्गातून ५०% च्या आत शाश्वत आरक्षण मिळावे या मागणीसाठी दिनांक ०८/०६/२०२४ पासून आमरण उपोषण करीत आहेत. त्या उपोषनास पाठींबा सकल मराठा समाज उमरगा तालुका यांच्या वतीने निवेदन देण्यात येत आहे. कृपया निवेदनाद्वारे मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना मागण्या मान्य करण्यात यावे. यासाठी या पत्राद्वारे आम्ही विनंती करत आहोत. 'जर जरांगे पाटील यांचे उपोषण चालुच राहिले व शासन उपोषण सोडण्याचा प्रयत्न करत नसेल तर मराठ्याद्वारे प्रत्येक गावात उपोषण चालु करण्यात येणार आहे. तसेच मराठ्यांच्या मुलांवर झालेले खोटे गुन्हेही ताबडतोब मागे घ्यावेत अशी मागणी तमाम मराठा समाज उमरगा तालुका च्या वतीने करण्यात आली आहे .

या निवेदनावर शांतकुमार मोरे , किरण गायकवाड, बाबुराव शहापुरे, अमोल पाटील, विष्णू भगत, सुभाष गायकवाड, मोहन जाधव, बापु बिराजदार ,शहाजी येळीकर, अण्णासाहेब पवार ,विजयकुमार नागणे ,विलास व्हटकर, मनोज जाधव ,अरुण जगताप, रामेश्वर सूर्यवंशी ,मंगेश भोसले, संदीप पाटील ,बाळासाहेब मोरे, उद्धव मुळे, खंडेराव औरादे, रोहित पवार, ज्योतिबा शिरगुरे ,अभिषेक औरादे ,गोविंद गाडवे ,दयानंद माने, किशोर शिंदे ,शंकर सूर्यवंशी, विशाल माने ,विकास जाधव ,मनोजकुमार जाधव , विठ्ठल पाटील, हरिभाऊ माने ,शरद पवार ,संजय माने, बाबा पवार, योगेश तपसाळे यांच्यासह मराठा बांधवांच्या सह्या आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवन बांधकाम करण्यासाठी १२ कोटी रुपयाचा निधी मंजूर

## वाढीव निधीसह २१ कोटींचे होणार सांस्कृतिक भवन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उदगीर । सुनिल बस्वराज हावा



उदगीर शहरातील नागरिकांची मागणी लक्षात घेवुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने उभारण्यात येत असलेल्या ' छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवनासाठी' राज्य शासनाच्या नगर विकास विभागाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत वाढीव १२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यापूर्वी या सांस्कृतिक भवनासाठी ९ कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता आता यामध्ये आणखी १२ कोटी रूपयाचा निधी वाढवण्यात आला असुन एकुण २१ कोटी रुपयाचा निधी छत्रपती शिवाजी महाराज शसांस्कृतिक भवनासाठी मंजूर केला असल्याची माहिती क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी दिली.


उदगीर शहर हे अलिकडे एक सांस्कृतिक शहर म्हणून नावारूपाला येत आहे. तीन राज्याच्या सीमेवर असलेल्या या शहराला एक सांस्कृतिक ओळख देण्यासाठी या भागाचे आमदार तथा महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे हे परिश्रम घेत आहेत. मागील काळात उदगीर शहरांमध्ये अखिल भारतीय साहित्य संमेलन, मराठी बाणा, चला हावा येऊद्या फेम हास्यकल्लोळ कार्यक्रम, जगप्रसिध्द गायक अजय - अतुल व अवधूत गुप्ते यांच्या संगीत मैफिलीसह विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी उदगीर शहराला सांस्कृतिक शहर म्हणून महाराष्ट्रात नावारुपाला आणले आहे. या भागातील नागरिकांना सांस्कृतिक मेजवानी मिळावी व यासाठी सुसज्ज अत्याधुनिक पद्धतीच्या सांस्कृतिक भवनाची गरज लक्षात घेऊन क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी उदगीर शहरात नाट्यगृहाची उभारणी सुरू केली आपल्या परिसरातील नागरिकांना सर्व सुविधायुक्त नाट्यगृह उपलब्ध व्हावे व या भागातील रसिकांना सांस्कृतिक मेजवानी मिळावी म्हणून राज्य शासनाकडून १२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेऊन उदगीर करांचे व या भागातील कलावंतांचे स्वप्न क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी पूर्ण केल्याने कलावंत, रसिक व सांस्कृतिक प्रेमी नागरिकांनी ना. संजय बनसोडे यांचे अभिनंदन करुन आभार व्यक्त केले आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा बंदिस्त पुतळा नियोजित जागेवर बसवा ; मराठा मावळा संघटनेचा तीव्र आंदोलनाचा इशारा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरखेड । सय्यद रहीम रजा



मागील अडीच वर्षा पासुन नगर पालीकेच्या कार्यालयात बंदिस्त ठेवण्यात आलेला बहुजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा नियोजित जागेवर सम्मानपुर्वक स्थापित करण्यात यावा अशी मागणी निवेदनाव्दारे मराठा मावळा संघटना महाराष्ट्र च्या वतीने मुख्याधिकारी नगर पालीका यांना देण्यात आले आहे

छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा बऱ्याच दिवसापासुन न पा . स्वनिधीतुन आणुन बंदिस्त ठेवला ही बाब अतिशय वेदनादायक असल्यामुळे वेगवेगळ्या सामाजिक संघटनेच्या माध्यमातून बंदिस्त असलेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा नियोजित जागेवर स्थापित करण्याची मागणी वेळोवेळी करण्यात येत असल्याने छत्रपती शिवाजी महाराजांचे अनुयायी सातत्याने आक्रमक होऊ लागले आहेत त्यामुळे हा पुतळा योग्य जागी स्थापित करण्याची नितांत गरज निर्माण झाल्याचे दिसत आहे अशाच मागणीचे निवेदन मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर येथील मराठा मावळा संघटने च्या वतीने उमरखेड येथे येऊन दिले आहे यावेळी संघटनेच्या मराठवाडा महिला कार्याध्यक्षा कल्पना चव्हाण व यवतमाळ जिल्हाध्यक्ष अमोल कदम पाटील, अरविंद गोविंद चव्हाण, संदीप कदम पाटिल तालुकाध्यक्ष उमरखेड संतोष नारायण चव्हाण पाटिल, आकाश सारंग अडसड पाटिल, कान्हा इगळे पाटिल, अविनाश कदम पाटिल, सतीश जाधव पाटिल आणि संतोष सखाराम कदम पाटिल यांच्या सह विदर्भ - मराठवाडा जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थीत होते पंधरा दिवसाचे आत छत्रपती शिवाजी महाराजांचा बंदिस्त असलेला पुतळा नियोजित जागेवर स्थापन केला गेला नसल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी दिलेल्या निवेदनातून देण्यात आला आहे या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी यवतमाळ तथा उपविभागीय अधिकारी उमरखेड यांच्यासह संबंधितांना देण्यात आल्या आहेत.



**लातूर लोकसभा निवडणुकीत इतिहास घडविणारे नवनिर्वाचित खा.डाँ.शिवाजीराव काळगे यांचा उदगीर येथील राधाई हॉस्पिटलचे प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.विश्वनाथ डांगे, प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ.बस्वराज स्वामी, डॉ.बस्वराज पटणे,शरद मोहिते, सुब्रमण्यम स्वामी यांनी सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.**

# बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर ईदगाह स्थळी पेव्हर ब्लॉकचे काम पूर्ण-डॉ.गणेश ढवळे



**लिंबागणेश येथील ईदगाह प्रार्थना स्थळांच्या ठीकाणी बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर सरपंच बालासाहेब जाधव यांच्या पुढाकाराने अल्पसंख्याक निधीमधून पेव्हर ब्लॉकचे काम आणि साफसफाई करण्यात आली.**

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904